# लघुवाद न्यायालय, मुंबई

लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, काळबादेवी रोड, मुंबई - ४०० ००२
दूरध्वनी क्र. ०२२-२२०८८७००/२२०८८७४९/१०४/१०५
Email : scc-mumbai@bhc.gov.in

## जाहीर सुचना

लघुवाद न्यायालय, मुंबई या न्यायालयाच्या धोबी तलाव, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२ येथील मुख्य कार्यालयातील जुनी व नविन इमारत तसेच बांद्रा शाखा, भास्कर इमारत, अनंत कानेकर मार्ग बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथील तिसरा मजला ते आठवा मजला येथील खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे न्यायालयीन कक्ष, विभाग, व्हरांडे व इतर ठिकाणी इन्जेक्शन व फवारणी पध्दतीने वाळवी प्रतिबंधक प्रक्रिया ३ (तीन) वर्षासाठी नोंदणीकृत ठेकेदारांकडून/ संस्थांकडून मोहोरबंद स्वरूपात जाहीर दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुख्य कार्यालय / शाखा | इमारत | इमारतीचे तपशील | पाहणी |
|---|---|---|---|---|
| १ | **मुख्य कार्यालय** | जुनी इमारत | तळ मजला ते चौथा मजल | दिनांक १०/०४/२०२४ ते २५/०४/२०२४ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यालय व बांद्रा शाखा येथे पाहणी करावी. |
| | लघुवाद न्यायालय, एल.टी. मार्ग पोलीस स्टेशन, धोबी तलाव, मुंबई - ४०० ००२. | नविन इमारत | तळघर, तळ मजला ते सहावा मजला | |
| २ | **वांद्रे शाखा**<br>लघुवाद न्यायालय, भास्कर इमारत, अनंत कानेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. | भास्कर बिल्डींग | तिसरा मजला ते आठवा मजला | |

तरी इच्छुक दरपत्रकधारकांनी / संस्थांनी सदर जाहीर दरपत्रकामधील अटी व शर्तीना अधिन राहून आपले दरपत्रक विहित नमुन्यात मोहोरबंद लखोटयात व त्या लखोटयाच्या वरच्या भागावर (मोठ्या अक्षरात **" वाळवी प्रतिबंधक प्रक्रिया करण्याबाबत दरपत्रक"** असे लिहून त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४००००२"** यांच्याकडे दरपत्रक सुचना प्रसिध्द केल्यापासून **दिनांक २९ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तरी इच्छूक दरपत्रकधारकांनी/ संस्थेने मुख्य कार्यालयातील व वांद्रे शाखेतील इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करून परिपूर्ण दरपत्रक वरील प्रमाणे दिलेल्या मुदतीत सादर करावेत. त्याकरिता इच्छूक दरपत्रकधारक/संस्था कार्यालयाच्या पूर्वपरवानगीने न्यायालयीन इमारतीची पाहणी करू शकतात. त्याकामी या कार्यालयातील पत्रव्यवहार विभागाशी संपर्क करण्यात यावा. सदर सविस्तर दरपत्रक सुचनांची माहिती शासनाच्या http://www.bombayhighcourt.nic.in व http://sccmumbai.dcourts.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

लघुवाद न्यायालय, मुंबई }
दिनांक: ८ एप्रिल, २०२४ }

(निलम शाहीर)
प्रबंधक

# लघुवाद न्यायालय मुंबई

लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, काळबादेवी रोड, मुंबई - ४०० ००२
दूरध्वनी क्र. ०२२-२२०८८७००/७४९/१०४/१०५

Website : http://sccmumbai.dcourts.gov.in

Email : scc-mumbai@bhc.gov.in

# जाहीर सुचना

**वाळवी प्रतिबंधक प्रक्रिया दरपत्रक सादर करण्यासंदर्भातील अटी व शर्ती व सुचना खालीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| १. | वाळवी प्रतिबंधक उपाययोजना ही ३ वर्षासाठी असणे आवश्यक आहे. |
| २. | दरपत्रकधारकाने दरपत्रक भरताना सर्व करासहीत रक्कम नमुद करावी तसेच सर्व करांची रक्कम तपशिलवार दरपत्रकात नमुद करावी. |
| ३. | दरपत्रकधारकाने / संस्थेने दरपत्रकासोबत वाळवी प्रतिबंधक प्रक्रिया करण्याच्या शासनाकडून मिळालेल्या परवान्याची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. |
| ४. | दरपत्रकधारकाने / संस्थेने आयकर रिटर्न भरले बाबत मागील तीन वर्षाच्या साक्षांकित प्रत, सेवाकर (GST) प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, पॅन कार्ड, इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रत देखील दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्याचे पुर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता, ई-मेल आयडी, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक दरपत्रकावर तसेच पाकीटावर नमुद करावे. |
| ५. | दरपत्रकधारकाने / संस्थेने यापूर्वी शासकीय किंवा खाजगी संस्थेत काम केले आहे त्या कामाचा तपशील व सदर संस्थेने / कार्यालयाने वितरित केलेले सदर कामाबाबतचे प्रमाणपत्र (३ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र) दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच दरपत्रकधारक कुठल्या प्रकारचे औषध वापरणार आहे याचा तपशिल दरपत्रकेत नमुद करणे आवश्यक आहे. |
| ६. | दरपत्रकधारकाने / संस्थेने दरपत्रक विहित नमुन्यात मोहोरबंद लखोटयाच्या वरच्या भागावर मोठ्या अक्षरात **"वाळवी प्रतिबंधक प्रक्रिया करण्याबाबत दरपत्रक"** असे लिहून त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२"** यांच्याकडे **दिनांक २९ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात. |
| ७. | दरपत्रकधाकाराने/संस्थेने सुरुवातीला इंजेक्शनपध्दतीने व पुन्हा १८ महिन्यानी इंजेक्शनपध्दतीने व दरम्यानच्या काळात प्रत्येकी ३ महिन्याने फवारणी पध्दतीने सेवा देणे बंधनकारक आहे तसेच ज्यावेळी वाळवीचा प्रादुर्भाव दिसेल त्यावेळी त्वरीत त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. ज्यावेळी या कार्यालयाने वाळवी प्रतिबंधक संदर्भान्वये निश्चित केलेल्या संस्थेस समस्यांबाबत पत्रव्यवहार केल्यास त्वरीत समस्यांचे निवारण करुन देणे संस्थेस बंधनकारक राहील. |
| ८. | दरपत्रकधारकाने / संस्थेने दरपत्रका सोबत त्यांची दरपत्रक मंजूर झाल्यास वरील सर्व अटी मंजूर असल्याचे व त्या अटींचे पालन करण्यात येईल असे लेखी हमीपत्र द्यावे लागेल. |

| | |
|---|---|
| ९ | दरपत्रक शुल्क (Tender Fees INR) रक्कम म्हणुन रुपये १,७००/- (रुपये एक हजार सातशे फक्त) (विनापरतावा) व बयाना रक्कम (EMD INR) म्हणुन रुपये ८,५००/- (रुपये आठ हजार पाचशे फक्त) (परतावा योग्य व्याजरहित) चे धनाकर्ष (Demand Draft) दरपत्रका सोबत देणे आवश्यक आहेत. **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई - ०२"** या नावाने वरील प्रमाणे धनाकर्ष सोबत दिलेले नसतील तर सदर दरपत्रक स्विकारले जाणार नाही. जी दरपत्रक स्विकारली जाईल त्यांची बयाना रक्कम करार संपेपर्यंत ठेवण्यात येईल व इतर दरपत्रक धारकांची बयाना रक्कम परत करण्यात येईल. **( दरपत्रक फी रक्कम व बयाना रक्कम धनाकर्षाद्वारे (Demand Draft) दरपत्रके सोबत दयावयाचे आहेत.)** |
| १० | सुक्ष्म व लघु मध्यम उद्योग विकास अधिनियम - २००६ अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना व शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना दरपत्रक शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल. परंतु सदरचे प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध असणे गरजेचे आहे. तसेच ज्या दरपत्रकधारकांकडे सदरचे प्रमाणपत्र नसेल तर त्यांना दरपत्रक शुल्क व बयाना रक्कम भरावी लागेल. |
| ११. | निश्चित केलेल्या दरपत्रकधारकाने/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी **कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर** सदरचे देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकधारकाला रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेश तसेच बॅंकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान अथवा अदाता नोंदणी प्रमाणपत्र यांची छायांकित प्रत देणे अनिवार्य आहे. सदर संस्थेने खालीलप्रमाणे देयक सादर करावे<br>अ) दरपत्रकेच्या ४०% रक्कम प्रथम इजेक्शनद्वारे प्रकिया झाल्यानंतर.<br>ब) दरपत्रकेच्या ३०% रक्कम दुस-यादा इजेक्शनद्वारे प्रकिया झाल्यानंतर.<br>क) दरपत्रकेच्या ३०% रक्कम निविदा कालावधी संपल्यानंतर (तीन वर्षानंतर). |
| १२. | मा. मुख्य न्यायाधिश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांना निश्चित केलेल्या संस्था/दरपत्रकधारकाने करारातील अटीचे पालन केले नाही किंवा सेवेमध्ये काही त्रुटी निर्माण झाल्यास सदर कंत्राट रद्द करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. त्यानुसार सदर संस्थेस/दरपत्रकधारकास नोटीस पाठविण्यात येवून त्यातील नमुद मुदतीत खुलासा न आल्यास सदरचा करार रद्द करण्यात येवून संस्थेची बयाना/अनामत रक्कम शासन दरबारी जमा करण्यात येईल. |
| १३. | दरपत्रक सुचनेमध्ये दर्शविण्यात आलेल्या तारीख व वेळेनंतर कुठलेही दरपत्रक स्विकारले जाणार नाही. |
| १४. | कुठल्याही प्रकारची ओळख किंवा दबाव आणल्यास सदर दरपत्रक रदद् केली जाईल. तसेच दरपत्रकधारक कुठल्याही गैरप्रकारासाठी अयोग्य, अपात्र ठरविला गेलेले नसावा. |
| १५. | दरपत्रकामध्ये कुठलीही खाडाखोड केलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. |
| १६. | मा. मुख्य न्यायाधिश लघुवाद न्यायालय, मुंबई यांनी घेतलेले निर्णय अंतिम राहतील. |
| १७. | दरपत्रक हे दरपत्रकधारकांच्या किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या समोर उघडले जातील. त्यावेळी हजर नसलेल्या दरपत्रकधारंकाची व त्यांच्या प्रतिनिधीची कुठलीही तक्रार नंतर ऐकली जाणार नाही. दरपत्रक उघडले जातील ती तारीख दरपत्रकधारकास दरपत्रक उघडण्यापूर्वी कळविण्यात येईल. |
| १८. | दरपत्रकधारकाने सहभागी दरपत्रक प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर दरपत्रकेतून माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. |

लघुवाद न्यायालय, मुंबई }
}
दिनांक: ८ एप्रिल, २०२४ }

(निलम शाहीर)
प्रबंधक

/home/minorwork/Desktop/Minor work sachin sir/Minor work sachin sir/home/minorwork/Minor Work fr.2017/Anti Termite Treatment/antitermite treatment 2019 .odt